**कार्यकारी अभियंता**
**मध्यम व लघु पाटबंधारे विभाग, अचलपुर**
पंचायत समितीचे मागे, अचलपूर (कॅम्प) ४४४८०५
दुरध्वनी कार्यालय : (०७२२३) २२१३२२ फॅक्स : (०७२२३) २२२७०७
ई-मेल: eepmpd@gmail.com

**//दरपत्रक सुचना क्र.२५//**

कार्यकारी अभियंता, मध्यम व लघु पाटबंधारे विभाग, पंचायत समितीच्या मागे, सिव्हील लाईन, अचलपूर जि.अमरावती या कार्यालयात विविध कंपनीचे एकुण १२ संगणक संच व प्रिंटर उपलब्ध असुन सबंधीत कंत्राटदार व एजन्सींनी कार्यालयात प्रत्यक्ष पाहणी करुन संगणक/प्रिंटर करीता लागणारे संपूर्ण प्रकारचे सुटे भाग व वार्षीक देखभाल दुरुस्तीकरीता खालील अटी व शर्ती नुसार दिनांक ०३.०३.२०२३ ते दिनांक १०.३.२०२३ या कालावधीत दरपत्रके मागविण्यात येत आहे.

**अटी व शर्ती**

१)दुरुस्तीकरीता लागणारे साहित्य नामांकित कंपनीचे पुरवठा करणे बंधनकारक आहे.

२)पुरवठा करण्यात येणाऱ्या साहित्याचे दर हे सर्व करासहीत असावे.त्याचे वेगळे भुगतान करण्यात येणार नाही.

३)पोष्टाने प्राप्त होणाऱ्या दरपत्रकास विलंब झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

४)दरपत्रक हे दिनांक १०.३.२०२३ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील.

५)प्राप्त होणारे दरपत्रक दिनांक १०.३.२०२३ रोजी उपस्थित एजन्सी/कंत्राटदार यांचे समक्ष उघडण्यात येतील. त्यानंतर कोणतीही तक्रार ग्राहय धरण्यात येणार नाही.

६)सादर करण्यात येणारे दर सिलबंद लखोटयात असावे.

७)सादर करण्यात येणारे दर आकडयात व अक्षरात असावे.

८)कमीत कमी मंजूर करण्यात येणारे दर ११ महिन्याचे कालावधीसाठी वैध राहतील.

९)एक किंवा सर्व दरपत्रके कोणतेही कारण न दर्शविता स्विकारणे अथवा नाकारण्याचे अधिकार खालील स्वाक्षरी करणाऱ्या अधिकाऱ्याने राखुन ठेवलेले आहे.

१०)देयकाचे भुगतान कार्यालयास प्राप्त होणाऱ्या निधीवर अवलंबून राहील. भुगतानासाठी विलंब झाल्यास व्याज देय राहणार नाही.

११)दुरुस्तीकरीता संपर्क केल्यानंतर २४ तासाचे आत दुरुस्ती करणे बंधनकारक राहील.

१२)रुपये १०००/- चे वर दुरुस्ती असल्यास त्याप्रमाणे लेखी अहवाल सादर करण्यात यावे. कार्यालयाचे परवानगीनंतरच दुरुस्तीची कार्यवाही करण्यात यावी.

१३)शासकीय सुटट्रीचे दिवशी सुंद्या संगणक प्रणालीमध्ये बिघाड झाल्यास तातडीने दुरुस्तीची कार्यवाही करणे बंधनकारक राहील.

१४)सदर अटी व शर्ती दर मंजूरीनंतर रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर करार करणे बंधनकारक राहील.

१५)दरपत्रक सादर करतेवेळी आधारकार्ड/पॅनकार्ड/एजन्सीचे परवान्याची छायाप्रत सत्यप्रतीत सादर करणे बंधनकारक राहील.

**(अ.अं.सावंत)**
कार्यकारी अभियंता
मध्यम व लघु पाटबंधारे विभाग,
अचलपूर

जावक क्रमांक/ 625 /भांशा/मवलपावि/संगणक/२०२२ दिनांकः- 01 MAR 2023

**प्रति,**

विभागीय कार्यालयाचे नोटीस बोर्डवर.

D:\store 24.03\11.docx